# अल्ला हो अकबर

**ना. सी. फडके**


**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

ajabpublications@gmail.com

**अल्ला हो अकबर : ना. सी. फडके**

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती**
२२ ऑक्टोबर, २०१३

**किंमत**
₹ ३५०/-

# अल्ला हो अकबर

## ग्रंथकर्त्याची सूचना

अकबराच्या राज्यपद्धतीचे, निरनिराळ्या यवन व हिंदू लोकांनी, भिन्न अर्थ कसे लावले ते पाहणे फार मनोरंजक आहे ही गोष्ट माझ्या मनात पुष्कळ दिवस घोळत होती आणि या अर्थभिन्नत्वाच्या पायावर एखाद्या चटकदार कादंबरीचे कथानक रचता येईल अशी खात्री होती. १९१४ साली बी.ए. झाल्यानंतर मला थोडासा रिकामा वेळ मिळू लागला व आता नेहमी मनात घोळणारे कथानक कितपत जुळविता येते ते पाहावे असा मी विचार केला. याच सुमारास 'मेरी कॉरेली' या ग्रंथकर्तीची 'Temporal Power' ही कादंबरी मी वाचली व त्या कथानकातील मध्यवर्ती कल्पना माझ्या कथानकात उत्तम तऱ्हेने गोवता येईल असे मला वाटले. तरी १९१५ साल तसेच गेले व मी एकही ओळ लिहिली नाही. १९१५ च्या डिसेंबर महिन्यात रा. पांगळ हे मला भेटले व त्यांचे माझे बोलणे होऊन १९१६ सालच्या जानेवारीच्या २२ व्या तारखेस प्रस्तुत ग्रंथाची पहिली दहा पाने मी लिहिली. 'Temporal Power' मधून मुख्य कल्पनेखेरीज कोणतीही दुसरी गोष्ट घेतली नसल्यामुळे माझ्यासारख्या नवशिक्या माणसाला एकंदर कथानक जुळविण्याच्या बाबतीत वारंवार अडचणी येत; शिवाय, एम्.ए. चा अभ्यास करावयाचा असल्यामुळे कादंबरी लेखनाचे काम व्हावे तितके जलद व एकसारखे झाले नाही. अभ्यासाकडे जास्त लक्ष पुरविणे भाग असल्याकारणाने उत्तरार्धाचा उत्तर भाग थोडासा घाईने लिहिला गेला आहे.

अकबर, सलीम, बिरबल, मानसिंग व फाजल याखेरीज बाकीच्या सर्व व्यक्ती काल्पनिक आहेत. ही कादंबरी सामाजिक नसल्यामुळे तिला ऐतिहासिक म्हणणे प्राप्त आहे. परंतु अकबराच्या काळच्या चालीरीती, बोलण्याची पद्धती, दरबारातील थाटमाट वगैरे गोष्टींचे चित्र रेखाटण्याचा माझा प्रयत्न मुळीच नाही. ऐतिहासिक कादंबऱ्यांहून माझी कृती बऱ्याच अंशी भिन्न आहे. उदाहरणार्थह्न अकबर राजाचे राजा या नात्याने वैभव किंवा ऐश्वर्य काय होते त्याचे वर्णन या ग्रंथात कोठेही आढळणार

नाही; किंवा काल्पनिक राणकदेवीचे ज्या ठिकाणी इतर ग्रंथकार भपकेबाज वर्णन करतील त्या ठिकाणी एक साधी व्यक्ती या नात्याने तिच्या मनःस्थितीचे मी वर्णन केले आहे. ऐतिहासिक व्यक्तींना १९१७ सालच्या सामाजिक स्त्रीपुरुषांचे स्वरूप देण्याचा मी प्रयत्न केला आहे. या प्रयत्नात त्यांच्या ऐतिहासिक स्वरूपांचा भंग होऊ न देण्याचीही मी खबरदारी घेतली आहे.

आपली अनिच्छा बाजूस ठेवून केवळ माझ्या विनंतीला मान देऊन माझे गुरुवर्य प्रो. रानडे एम्.ए. यांनी प्रस्तावना लिहिली त्याबद्दल त्यांचे मानावे तितके आभार थोडेच होत. बाकी त्यांनी केलेल्या अवास्तव स्तुतीस मी सर्वथैव अपात्र आहे.

मला सर्वदा प्रोत्साहन देणारे माझे स्नेही रा.रा. दत्तोपंत घारपुरे यांनी आपला वेळ खर्च करून प्रुफे तपासण्याचे काम केल्याबद्दल त्यांचा मी आभारी आहे.

**ग्रंथकर्ता**

## प्रस्तावना

माझे मित्र व माजी विद्यार्थी रा.नारायण सीताराम फडके एम्.ए. यांनी जी प्रस्तुत ऐतिहासिक कादंबरी लिहिली आहे तिजला प्रस्तावनेदाखल दोन शब्द लिहिणे ही मोठी आनंदाची गोष्ट समजतो. माझा व रा.फडके यांचा आज निदान ३।४ वर्षांचा संबंध आहे. त्यांचा फर्ग्युसन कॉलेजमध्ये तत्त्वज्ञानाचा अभ्यास होऊन त्यांची एम्.ए. परीक्षाही चांगल्या रीतीने पार पडली, व ते पुढील वर्षापासून ‘न्यू पूना कॉलेज’ मध्ये तत्त्वज्ञानाचे प्रोफेसर होणार आहेत. तत्त्वज्ञानाचा अभ्यास करणाऱ्या लोकांचा परस्पर जास्त जास्त संबंध येऊन प्रेमवृद्धी व्हावी व फर्ग्युसन कॉलेज व न्यू पूना कॉलेज यांचा उत्तरोत्तर जास्त जास्त मित्रसंबंध वाढावा अशा उद्देशाने प्रस्तावना लिहिण्यास मी कितीही अपात्र असलो तरी, प्रस्तावनेदाखल चार शब्द लिहावे असे मनात योजून मजला या कादंबरीसंबंधाने जे वाटतं आहे ते मी वाचकवर्गापुढे ठेवितो.

रा.फडके यांनी ही जी कादंबरी लिहिली आहे ती ऐतिहासिक कादंबरी असून अकबर बादशहाच्या वेळेच्या ग्रंथक गोष्टीचे चित्र या कादंबरीत अत्यंत उत्कृष्ट रीतीने वठविण्याचा प्रयत्न कर्त्याकडून झाला आहे. कादंबरीतील भाषा अत्यंत मनोरंजक असून माझ्या एका मित्राने म्हटल्याप्रमाणे ‘आपण काव्य वाचीत आहो किंवा काय’ असा वारंवार भास होतो. अलीकडील इंग्रजी शिकलेल्या मंडळीस शुद्ध व चांगले मराठी मुळीच लिहिता येत नाही असा जो त्यांचेवर आक्षेप आहे तो रा.फडके यांनी पूर्णपणे धुऊन टाकला आहे. रा.फडके यांचे इंग्रजी भाषेत जितके प्रावीण्य आहे तितकेच किंबहुना त्यापेक्षा जास्त मराठी भाषेवर त्यांचे प्रभुत्व आहे असे म्हटले असता वावगे होणार नाही. भाषासौंदर्य, उच्च प्रतिभा व रचनाकौशल्य क्षणोक्षणी या कादंबरीत दिसून येते; व म्हणून रा.फडके यांनी आणिक कादंबऱ्या लिहिण्याचे मनात आणल्यास ते

आपल्या मराठी भाषेत अत्यंत उच्च दर्जाचे कादंबरीकार म्हणून नावाजतील यात शंका नाही.

जेथे सर्वच कादंबरी चांगली आहे तेथे तीतील उत्तम स्थळे निवडणे थोडेसे कठीण आहे. तथापि वाचकांचे सोयीकरिता तीतील काही उत्तम भाग दाखविले असता काहीसा उपयोग होईल असे वाटते.

''राणकदेवीचा नौकाविहार (पृ.३० ते ३३); तिचे महालात परत येणे (पृ. ४७ ते ५०); व एकंदरीत तिचे बहारदार वर्णन, सलीमह्नजुलिया यांचे रोमियो व ज्यूलियेट प्रमाणे परस्पर संबंध (प्र.४ थे); जुलियेचे नर्तन, व ऐतिहासिक दृष्टीने किंचित् निष्कारण दिसणारा अकबराचा तिचेबद्दल क्रोधावेश (प्र. १० व ११); मेहरुन्निसाचे गाणे व भिक्षा मागणे (प्र. ५५); धवलसिंहचा कटवाल्याशी घडलेला अति चमत्कारिक संवाद व त्याचा शेवट (प्र. २७); प्रेमाच्या दोन स्वरूपांचे उत्कृष्ट चित्र रेखाटन (प्र. २९).'' हे प्रसंग कादंबरीत फारच उत्तम साधले आहेत. रा. फडके यांनी या प्रसंगांखेरीज दुसरे काही जरी लिहिले नसते तथापि त्यांचे नाव मराठी कादंबरीकारांत फार उच्च दर्जाचे ठरले असते यात शंका नाही.

ऐतिहासिक कादंबरीत इतिहासाचे स्थान काय, व या कादंबरीत इतिहासाशी विसंवाद झाला आहे किंवा कसे, व असल्यास तो कोठे जाहला आहे या प्रश्नांची चर्चा मी मार्मिक इतिहासतज्ज्ञांकडे सोपवितो. मजला या प्रश्नाबद्दल फारसे लिहिता येईल असे वाटत नाही. तथापि इतके मात्र खात्रीने वाटते की रा. फडके यांनी या कादंबरीतच आपल्या प्रयत्नांची परिसमाप्ती न करिता या कादंबरीसारख्याच किंबहुना याहीपेक्षा उत्तरोत्तर सरस ऐतिहासिक कादंबऱ्या लिहून, रा. हरिभाऊ आपटे यांनी ज्याप्रमाणे मराठ्यांचा इतिहास कादंबरीरूपाने जगापुढे मांडला आहे त्याप्रमाणे मोगल इतिहासाचे कादंबरीकार या नावाने रा. फडके यांनी प्रसिद्ध व्हावे व मराठी भाषेस ऋणी करून ठेवावे इतकीच इच्छा आहे.

फर्ग्युसन कॉलेज, पुणे.

१७।३।१९. **रा. द. रानडे**

# १

# ''काजी आले''

''सृष्टी ईश्वरनिर्मित आहे. पृथ्वीभोंवती आज्ञाधारक रक्षकांप्रमाणें सदैव जागरूकपणे प्रदक्षिणा घालणाऱ्या सूर्यचंद्रांचे वीर्यदायक व आल्हाददायक तेज. मेघमंडलातून बेजबाबदारपणें वाटेल तिकडे संचार करणाऱ्या विद्युल्लतेचें चांचल्य व वर्षाकालीं गर्जना करणाऱ्या मेघांचें गांभीर्यही–सर्व ईश्वरनिर्मितच आहेत. वृक्षाभोवतीं वेडींवांकडी वेटाळीं घालीत चढणाऱ्या पुष्पवेलींतील सहजता आणि मोहकपणा ईश्वरानेंच उत्पन्न केला. कांटेरी देठांतून वर डोकावणाऱ्या गुलाबाच्या कळींत गुलाबी रंग आणि सुवास ओतून ईश्वरानेंच तिला सुंदर केली; बेसुमार उंचीवरून सदासर्वकाळ धाड् धाड् उडी टाकणाऱ्या धबधब्याचें उदात्त गांभीर्यही ईश्वरानेंच निर्माण केलें; आणि रात्रीच्या वेळीं, लपंडाव खेळल्याप्रमाणें मध्येंच चकमकून लगेच नाहींशा झाल्याचा आभास उत्पन्न करणाऱ्या, नटणाऱ्या, मुरडणाऱ्या, तेजाच्या छंदात नाचणाऱ्या अगणित तारका पोटांत ठेवणाऱ्या आकाशाचें अनंतत्वही, ईश्वरानेंच अस्तित्वांत आणलें. अखिल सृष्टी अल्लाची आहे. यमुनेचा प्रवाहही अल्लानेंच आखून दिला; अरवलीच्या रम्य शिखरांनाही ईश्वरानेंच उच्च स्थान दिलें. सारांश, स्वर्ग आणि पृथ्वी अल्लाच्या इच्छामात्रेंकरून अस्तित्वांत आली यांत शंकाच नाहीं. म्हणून सर्व सृष्टी ईश्वराची आहे–परंतु ! मनुष्य ! ईश्वराच्या तेजोबलानें उत्पन्न झालेल्या सृष्टीवर अधिकार गाजवू पाहणारा, आपल्या बुद्धीचा टेंभा मिरविणारा मनुष्य 'आ: ! या खुदा ! मनुष्याच्या उत्पत्तींत ईश्वराची लीला दृश्यमान होत नाहीं ! सैतानाच्या साम्राज्यांतील धातू आणि रस एकत्र झाल्यामुळें मनुष्य उत्पन्न झाला

असावा ! कारण स्वर्ग आणि पृथ्वी आनंदानें नांदतात; मनुष्याच्यानें बंड उभारल्याशिवाय राहवत नाहीं. प्रेमानें नटून एकरस बनून गेलेल्या सृष्टीमध्यें कलहाचें बीज पेरणारा मानव प्राणी भिन्नरस उत्पन्न करतो. थोडेंसें यश मिळू लागल्यावर मनुष्य बेफाम होतो; धर्म, नीती इत्यादी पवित्र विषयांची नालस्ती करूं लागतो; आणि या विराट सृष्टीचा उत्पादक जो सौंदर्यमय आणि दयामय ईश्वर-अल्ला त्याच्याविषयी नास्तिक मतें प्रतिपादन करण्यात त्याला फुशारकी वाटूं लागते. जन्मापासून मृत्यूकालांपर्यंत सृष्टीच्या नियमांचे रहस्य उलगडण्याच्या भलत्या फंदांत पडून, दीपज्योतीच्या प्रखर प्रकाशाचे कोडें सोडवण्यासाठीं जवळ जवळ घिरट्या घालण्याचे अक्षम्य व हास्यास्पद साहस करणाऱ्या पतंगाप्रमाणें, एका क्षणांत मरून जाणाऱ्या मानवप्राण्या ! ज्या तुझ्या आशांचा, सामर्थ्यांचा, शक्तींचा, इच्छांचा, तूं सारखा घोष करीत असतोस त्या, फार तर एक रात्रीपर्यंत टिकणाऱ्या मुंग्यांच्या प्रचंड वारुळाइतक्याच क्षणभंगुर आहेत हें तुला कसें कळत नाहीं ? कळेल तर किती बहार होईल ! सृष्टीविरुद्ध मनुष्य पुन्हां पुन्हां उठत असतो; आणि दर वेळेस त्या क्षुद्र बंडखोराला एक थप्पड लगावून सृष्टी गप्प बसवीत असते ! धूळपाटीवर लिहिलेल्या बेरजेच्या उदाहरणाकडे लक्ष लावून, आपल्या मतानें बरोबर रीतीनें तें सोडवणाऱ्या, परंतु पुन्हां पुन्हां चुकीचे उत्तर दाखवणाऱ्या, छोकऱ्याचें आंकडेकौशल्य ज्याप्रमाणें शिक्षक पुन्हां पुन्हां पुसून टाकीत असतो, त्याचप्रमाणें माणसाचा सर्व अहंकार सृष्टी पुन्हां पुन्हां पुसून टाकीत असते ! उदाहरण सोडवितांना योग्य रीतीनें उपयोगांत आणल्यास उत्तर बरोबर आल्याशिवाय राहणार नाहीं. माझें राज्य, माझा धर्म-ही रीती खात्रीनें चुकलेली आहे ! उलट आपला धर्म, आपलें राज्य, आपला सर्वांचा परमेश्वर या रीतीनें तें सोडविल्यास बरोबर उत्तर आल्याशिवाय राहणार नाहीं ! 'अल्ला हो अकबर !''

याप्रमाणें विचारतरंगात अकबर बादशहा तल्लीन होऊन गेला होता. तो या वेळीं राजवाड्याच्या मागच्या बगीच्यांतील संगमरवरी दगडांच्या चौथऱ्यावर बसला होता. अकबराची शरीरयष्टी आणि चर्या, दोहोंतही राजतेज चमकत होतें. तो जरी खराखुरा उंच नव्हता तरी त्याच्या बांध्यावरून तो उंचेलेसा आहेसें वाटे. त्याचें कपाळ रुंद असून, धैर्य, औदार्य, दरारा आणि दया या सर्व गुणांची एकदम साक्ष देणारे त्याचे डोळे फारच तेज:पुंज दिसत होते. या वेळीं त्या डोळ्यांची दृष्टी बगीच्याला लागून



असणाऱ्या यमुनेच्या पात्राकडे लागलेली होती. अस्ताला जाणाऱ्या सूर्याच्या प्रकाशानें यमुनेचें पाणी मनोहरपणें चमकत होतें; वर खालीं हलके हलके तालबद्धपणे नाचणाऱ्या पाण्याच्या लहरींच्या योगानें सूर्याची किरणेंही ढगांच्या विजेप्रमाणें चंचलपणें चकाकत होतीं; मावळणाऱ्या सूर्याच्या मंडलावर, बुरखा घातल्याप्रमाणें दिसणाऱ्या तांबूस ढगांना सोनेरी मुलामा दिल्यासारखा वाटत होता; ढगांच्या आजूबाजूस सहज शिंपडल्याप्रमाणें दिसणाऱ्या दिसणाऱ्या ठिपक्यांच्या अनंत विचित्र रंगांची शोभातर बहारीची होती; आणि यमुनेच्या जलपृष्ठावरून ऐटीनें डुलत डुलत संचार करणाऱ्या विहारनौका पाहूनही मनाला मोठा आल्हाद वाटत होता. याचवेळीं बगीचांतही निरनिराळ्या फुलांचा मिश्र परंतु अस्पष्ट सुगंध दरवळला होता; व एक माळी पुष्पगंधाच्या वेलीचीं फुलें भराभर तोडीत असल्यामुळें त्यांचा वास प्रामुख्याने अधिक भासत होता; त्या पांढऱ्या शुभ्र फुलांचा ढीग त्याच्या डाव्या बाजूच्या गवताच्या झुबक्यावर पडलेला दिसत होता; तरी तो माळी भराभर एकामागून एक फुलें तोडींतच होता. शेवटीं त्याचें तोडणें संपलें आणि तो पुष्पसंभार एका टोपलींत घालून तो जाऊं लागला.

माळी फुलें तोडीत असतांनाच अकबर त्याच्याकडे पाहत होता. माळ्याच्या हाताचें हालणें अकबर इतकें लक्षपूर्वक पाहात होता, कीं त्या हाताचें फुलाजवळ जाणें, नंतर फुलाभोवतीं बोटें मिटणें, तें खुडणें आणि ढिगांत टाकणें, यांपैकी एकही क्रिया त्याच्या नजरेतून सुटली नाहीं. बादशहाच्या काय मनांत आलें कोण जाणें त्यानें माळ्याला खूण केली आणि जवळ बोलाविलें.

''फुलें कोणाच्या महालांत नेतो आहेस रे ?'' अकबरानें विचारलें.

माळी लवून कुर्निसात करून म्हणाला, ''जी खाविद बेगमसाहेबांच्या;'' आणि खाली मान करून उभा राहिला. बराच वेळ अकबर काहींच बोलला नाहीं; आणि माळीही एखाद्या पुतळ्याप्रमाणें जमिनीकडे पहात उभा राहिला.

शेवटीं एक अस्पष्ट नि:श्वास सोडून अकबर म्हणाला, ''राणकदेवीच्या महालांत नेऊन ठेव सगळीं फुलें !''

''जी हुजूर !'' असें म्हणून मुजरा करून माळी निघून गेला.

त्याच्याकडे बादशहाचे लक्ष नव्हतें. तो कसल्या तरी निराळ्या विचारांत एकदम गुंग झाल्यासारखा दिसला. प्रारंभीच्या विचारांत जेव्हां अकबर गर्क झाला होता,